Original.

C.B.S.E. 17 R.A. New Delhi
Class IX
Sample Paper
(For Summative Assessment)
MARATHI

M.M. 80 Time: 3 hrs.

The question paper is divided into four sections:

| | | |
|---|---|---|
| Section A | Grammar | 10 marks |
| Section B | Composition | 20 marks |
| Section C | Comprehension | 10 marks |
| Section D | Literature | 40 marks |

All questions are compulsory.
Marks are indicated against each question.
This Question Paper is consists of 3 pages.

MARATHI (CODE NO: 009)
SUMMATIVE ASSESSMENT
CLASS IX set I
SECOND TERM (OCTOBER 2010 – MARCH 2011)
SAMPLE QUESTION PAPER

M.M. 80 Time: 3 hrs.

**SECTION A (GRAMMAR)**

Q. 1) (i) 'आनंद' या शब्दाचा पुढीलपैकी कोणता शब्द समानार्थी आहे? (5)

(a) हर्ष (b) दुःख (c) समाधान (d) तृप्ती

(ii) 'स्त्री' या शब्दाचा पुढीलपैकी कोणता शब्द समानार्थी आहे?

(a) महिला (b) व्यक्ती (c) मुलगी (d) माणूस

(iii) 'शहाणा' या शब्दाचा विरूद्धार्थी शब्द पुढीलपैकी कोणता?

(a) वेडा (b) रागीट (c) सज्जन (d) दुर्जन

(iv) 'प्रेम' या शब्दाचा विरूद्धार्थी शब्द पुढीलपैकी कोणता?

(a) द्वेष (b) माया (c) संताप (d) मत्सर

(v) 'जवळ' या शब्दाचा विरूद्धार्थी शब्द पुढीलपैकी कोणता?

(a) दूर (b) पलीकडे (c) समोर (d) शेजारी

Q. 2) (i) 'चहाफराळ' हा कोणता समास आहे? (5)

(a) कर्मधारय (b) समाहार द्वंद्व (c) नञ बहुव्रीहि (d) तत् पुरुष

(ii) 'राजवाडा' हा कोणता समास आहे?

(a) षष्ठी तत् पुरुष (b) चतुर्थी तत् पुरुष (c) अव्ययीभाव (d) कर्मधारय

(iii) ‘दिवसेंदिवस’ या शब्दाचा समास ओळखा.

(a) अव्ययीभाव (b) तत् पुरुष (c) कर्मधारय (d) द्वंद्व

(iv) ‘दशानन’ या शब्दाचा खालीलपैकी समास ओळखा.

(a) बहुव्रीहि (b) कर्मधारय (c) चतुर्थी तत् पुरुष (d) अव्ययीभाव

(v) ‘मुरलीधर’ या शब्दाचा समास ओळखा.

(a) कर्मधारय (ब) षष्ठी तत् पुरुष (c) द्वंद्व (d) बहुव्रीहि

## SECTION B (COMPOSITION)

Q. 3) (a) आपल्या मित्रास शाळेतील प्रजासत्ताक दिवसाचा कार्यक्रम कसा झाला ते पत्राने कळवा. (5)

(b) तुमचे गणिताचे पुस्तक हरविले आहे. त्याबद्दल सूचना तयार करा. तुम्ही इयत्ता नववीचे विद्यार्थी आहात. (5)

Q. 4) पुढीलपैकी <u>एका</u> विषयावर दहा ओळींचा परिच्छेद लिहा. (10)

(a) अति तेथे माती

(b) शहाण्याला शब्दाचा मार

(c) ग्रंथ हेच गुरु

## SECTION C (COMPREHENSION)

Q. 5) पुढील उतारा वाचून त्या खालील प्रश्नांची उत्तरे तुमच्या शब्दात लिहा.

गीताधर्माप्रमाणे नम्र चालून कर्तव्य करणारा आणि मानवी प्राण्याला जेवढे समाधान मिळविणे शक्य आहे, तसे मिळविणारा असा राष्ट्रपुरुष काय तो एक युधिष्ठिर आहे. धर्म, अर्थ, काम, मोक्ष या चतुर्वर्गाचा त्याच्या ठायी योग्य मिलाप झाला होता.

ऐहिक विजय, ऐहिक सुख, ऐहिक वैभव ही सर्व बाहेरून आकर्षक आणि आतून निःसार अशा कवंडाळाच्या फळासारखी असतात, हे समजून तो वागला आहे. ‘धर्मो रक्षति रक्षितः’ हे त्यांचे ब्रीदवाक्य. धर्ममार्गावर युधिष्ठिराची जेवढी श्रद्धा तेवढी कोणाचीच दिसून येत नाही. धर्ममार्ग आपणास कोठेही नेवो, निःशंकपणे तेथे जावयाचे आणि धर्माच्या हाती आपण केव्हाही सुरक्षितच आहोत, अशी श्रद्धा कायम ठेवायची, या वृत्तीने धर्मराजाचे जीवन सर्व बाजूंनी सफलच झाले आहे.

(i) युधिष्ठिराने मानवी जीवनात सुख कसे मिळविले? (3)

(ii) कवंडाळाच्या फळासारखे काय आहे? (3)

(iii) युधिष्ठिराच्या ठायी खालीलपैकी कोणत्या चार वर्गाचा मिलाप झाला आहे? योग्य पर्याय ओळखा.

(a) धर्म, अर्थ, काम, मोक्ष

(b) यश, अर्थ, काम, मोक्ष

(c) सुख, धर्म, काम, मोक्ष

(d) धर्म, अर्थ, काम, प्रेम (2)

(iv) खालीलपैकी युधिष्ठिराचे ब्रीदवाक्य कोणते?

(a) सत्यमेव जयते

(b) धर्मो रक्षति रक्षितः

(c) वसुधैव कुटुंबकम्

(d) सर्वजनहिताय सर्वजनसुखाय (2)

## SECTION D (LITERATURE)

Q. 6) पुढीलपैकी <u>तीन</u> प्रश्नांची उत्तरे थोडक्यात लिहा. (5 x 3) = 15

(i) स्कॉलरशिपबद्दल लोकमान्य टिळकांनी कोणते मत मांडले?

(ii) बादशहाने सेनापती संतांजीचा कशाप्रकारे काटा काढला?

(iii) सर्पदंशाच्या कोणकोणत्या समजुती लोकांमध्ये प्रचलित आहेत?

(iv) यंत्रमानवाच्या मेंदूवर कोणते नियम ठसविले गेले होते?

(v) पाऊस पडावा म्हणून लोकांनी कोणकोणते प्रयत्न केले?

Q. 7) (A) जुन्या घराची प्रतिमा कवयित्रीने कशासाठी वापरली आहे? (2)

(a) जुन्या आठवणींना उजाळा देण्यासाठी

(b) नव्या पिढीच्या जीवनातील बदल दाखविण्यासाठी

(c) भविष्यातील स्वप्ने रंगविण्यासाठी

(d) जुन्या पिढीबद्दल कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी

(B) गाण्याकडे कवी कोणत्या दृष्टिकोनातून पाहतो? (3)

(C) सायमन मार्टिन यांनी दुष्काळासंबंधी कोणती भावना व्यक्त केली आहे? (5)

(D) आनंद निर्माण व्हावा व विषमता नष्ट व्हावी म्हणून वामनदादा कर्डकांनी काय सुचविले आहे? (5)

Q. 8) (A) बन्याबापूंचा इनामदारी खाक्या कोणत्या गोष्टींतून व्यक्त होतो? (6)

(B) बुधाचे लहानपण कशाप्रकारे गेले? (4)